**स्मार्ट मित्र-मैत्रिणींनो,**

आनंदाची बातमी. तुमच्यासाठी सुरू केलेला 'गाथा ज्ञानाची' हा उपक्रम सर्वांनाच आवडू लागला आहे. ते सांगणारी ई-मेलसुद्धा 'लोकसत्ता'कडे येत आहेत. गाथेचे वाचक राकेश म्हात्रे यांनी गाथा सहज-सोप्या शब्दांत असल्याबद्दल अभिनंदन केले आहे. कात्रण कापण्याच्या व चिकटवही करण्याची स्पर्धा विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठीच असल्यामुळे मोठ्यांना त्यात भाग घेता येत नाही, याबाबत खंतही त्यांनी व्यक्त केली आहे... अशा वाचकांना स्पर्धेत भाग घेता येणार नसला तरी त्यांना त्यातील माहितीचा नक्कीच फायदा करून घेता येईल.

याशिवाय शाळांमधून विद्याथी-विद्यार्थिनींचाही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. हवामानबदल व पर्यावरण या गोष्टींबाबत आपणाला काही सांगायचे असेल तर जरूर लिहा. याबाबत आपली पत्रे आणि 'ई-मेल'ची वाट पाहत आहोत. त्यासाठीचा पत्ता लिहून घ्या-

**लोकसत्ता, ३/११, अरोरा टॉवर्स, ९ ए मोलेदिना रोड, लष्कर, पुणे-** ४११००१ (पत्राच्या पाकिटावर 'गाथा ज्ञानाची' असे आवर्जून लिहा)

किंवा पुढील ॲड्रेसवर ई-मेल करा-
loksattagatha2008@gmail.com

(गाथेच्या ६ ते ११ भागांची उत्तरे पुढीलप्रमाणे-)

**प्रश्न ६. भारताचे स्थान फार पूर्वी कोठे होते?**

उत्तर- अंटार्क्टिका खंडाजवळ.

**प्रश्न ७. पृथ्वीवर कोट्यवधी वर्षांपूर्वी कोणते जीव होते हे कशावरून समजते?**

उत्तर- त्यांच्या जिवाष्मांवरून.

**प्रश्न ८. सूर्य जास्त उष्णता बाहेर टाकतो तेव्हा जागतिक तापमानात किती वाढ होते?**

उत्तर- ०.१ अंश सेल्सिअसने.

**प्रश्न ९. पृथ्वीची सूर्याभोवती फिरण्याची कक्षा कोणत्या आकाराची असते?**

उत्तर- वर्तुळाकार किंवा लंबवर्तुळाकार.

**प्रश्न १०. खडकाची जास्त झीज झाली की हवेतील कार्बन डायऑक्साईड कमी शोषला जातो की जास्त?**

उत्तर- जास्त.

**प्रश्न ११. समुद्रातून वाहणाऱ्या नद्या म्हणजे काय?**

उत्तर- समुद्रातील थंड व गरम पाण्याचे प्रवाह.



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
**लोकसत्ता गाथा ज्ञानाची**


**प्रदूषण मुक्त गोविंदा खेळा**




**जन्माष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा**

**प्लॅस्टिकचे फुगे, प्लॅस्टिकच्या पिशव्या गोविंदावर मारणे टाळूया. ध्वनिवर्धकाचा वापर कमी करुन ध्वनीप्रदूषणापासून आपले शहर मुक्त ठेवुया.**

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
वेबसाईट:http://mpcb.mah.nic.in